

# || अथ श्रीसाईसच्चरित || अध्याय ५२ ||

|| श्रीगणेशाय नमः || श्रीसरस्वत्यै नमः || श्रीगुरूभ्यो नमः || श्रीकुलदेवतायै नमः || श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः। श्रीसद्‌गुरूसाईनाथाय नमः || आतां करूं सिंहावलोकन || तदनंतर ग्रंथ संपूर्ण। करूं [1]अवतरणिका देऊन। सारांश निवेदन ग्रंथाचा ||१|| देहीं असतां निजभक्तांला। वेळोवेळीं जो अनुभव दिधला। त्याचा ग्रंथ ही 'साईलीला'। ग्रंथ लिहविला स्मरणार्थ ||२|| 'साईलीला' परम पवित्र। त्यांतील सच्चरितकथासत्र। वाचा हें निजगुरूचरित्र। इहपरत्रप्रबोधक ||३|| संग्रहीं ज्या ते असंख्यात। परी व्युत्पत्तिविद्यारहित। करीं धरूनि हेमाडपंत। हें निज सच्चरित लिहविलें ||४|| कांही आपण आपुली ख्याती। स्वमुखें शिष्यां श्रवण करविती। तेही गेलिया निजधामाप्रती। या ग्रंथा स्फूर्ती तैंपासून ||५|| परोपरीच्या वार्ता गहन। साई जेव्हां करीत कथन। श्रोते होत अत्यंत तल्लीन। भूक तहान विसरत ||६|| जिंही पाहिलें साईस्वरूप। हरले तयांचे त्रिविध ताप। ऐसा ज्यांचा तेजःप्रताप। साद्यंत केवीं वर्णावा ||७|| ऐसा साई उदारकीर्ति। जे जे लागले त्याच्या भक्तीं। तयांचिया उद्धाराप्रति। ठेविली निजख्याती लिहून ||८|| गोदावरीचें पवित्र स्नान। पुढें घेवोनियां समाधिदर्शन। करावें हें सच्चरित श्रवण। त्रिताप शमन होतील ||९|| सहज बोलतां जयाच्या

१. यात अवतरणिका दिलेली नाही. पहिल्याच ओवीत अवतरणिका देऊ असे लिहिले आहे; परंतु तिचे हस्तलिखित सापडले नाही.

गोष्टी। नकळत पडे परमार्थमिठी। प्रेमें घाला या ग्रंथीं दिठी। पापांच्या कोटी निरसतील॥१०॥ जन्म–मरण–यातायाती। चुकवाव्या जे मनें इच्छिती। तिंहीं अखंड स्मरणभक्ती। गुरूपदासक्ती जोडावी॥११॥ प्रमाद मिथ्या ज्ञानाचें कारण। आत्मरूपी [2]अनवधारण। जेथूनि उद्‌भवे जनन–मरण। सर्वानर्थ–निदान जें॥१२॥ मोह म्हणजे मिथ्या ज्ञान। अनात्मठायीं आत्माभिमान। तोच मृत्यू विद्वज्जन। लक्षण करितात॥१३॥ साई–कथासागरमंथन। करितां साईकथाकथन। गोडी जिची नित्य नूतन। श्रोत्यांचें अध:पतन चुकेल॥१४॥ साईंचें गुणमय [3]स्थाळस्वरूप। त्याचें करितां ध्यान अमूप। प्रकटेल सूक्ष्मतम आत्मस्वरूप। होऊनि लोप सगुणाचा॥१५॥ न होतां सगुणरूपीं प्रवेश। कळेना आत्म ज्योतीश। परब्रह्म जें निर्विशेष। दुर्बोध नि:शेष जाणावया॥१६॥ जेणें दावुनी आपुलीं पाऊलें। प्रेमें निजभक्त भाविक बळें। देहींच असतां विदेही केलें। परमार्था लाविलें अकळपणें॥१७॥ सागरासी देतां आलिंगन। सरिता विसरते सरितापण। तैसा भक्त येतां शरण। नुरविसी दुजेपण भक्ताचें॥१८॥ दोनी दीप एक होती। एकमेकां आलिंगन देती। तात्काळ हारपे द्वैतस्थिती। एकचि दीप्ति एकत्वें॥१९॥ कर्पूर सोडूनि त्याची [4]दृति। सूर्या सोडूनि त्याची दीप्ति। कनका सोडूनि त्याची कांती। राहील कां निश्चिती वेगळी॥२०॥ जैसी सागरीं रिघे सरिता। सागरचि होऊनि ठाके तत्त्वतां। अथवा लवण सागरीं रिघतां। सागरीं समरसता तत्काळ॥२१॥ तेणेंपरी येतां साईपदीं शरण। भक्तांमाजीं नुरे दुजेपण। भक्त होती समसमान। त्यागुनी मीपण आपुलें॥२२॥ जागृती स्वप्न अथवा सुषुप्ति।

---

२. अनिश्चय, अननुसंधान ३. स्थाळ म्हणजे हांडा (स्थूळ भांडे) ४. सुवास

तिहींमाजील कवण्याही स्थितीं। जाहलिया साईमय वृत्ति। संसारनिवृत्ति काय दुजी ।।२३।। असो आतां येऊनि लोटांगणासी। हेंचि मागतों पायांपाशीं। तुजवीण अन्यत्र या वांछेसी। जाऊं न देसी एकसरीं ।।२४।। ब्रह्मादिस्तंबपर्यंत। घटमठीं सबाह्य आकाशवत। परिपूर्ण जो सर्व भूतांत। विषमता यत्किंचित जो नेणे ।।२५।। सकळ भक्त ज्या समसमान। जो नेणे मानावमान। प्रियाप्रिय नेणे जयाचें मन। जया न विषमपण तिळभर ।।२६।। शरण रिघूं त्या साईसमर्था। जो निजस्मरणें दे सर्वार्था। त्याच्या चरणीं अखंड माथा। ठेवुनी कृतार्था होऊं कां ।।२७।। आतां श्रोते सज्जन भक्तप्रवर। सर्वां माझा नमस्कार। तुम्ही थोर मित्राचार। विनवितों साचार तें परिसा ।।२८।। मासोमासीं काढूनि अवसर। कथा परिसल्या ज्या हा काळवर। त्या जयाच्या, तयाचा विसर। नेदा क्षणभर पडावया ।।२९।। आपण जों जों सप्रेम चित्ता। परीसतां या साईच्या कथा। तों तों मी जो येथील वक्ता। तया उल्हासता दे साई ।।३०।। तैसें जैं श्रोते न दत्तावधान। वक्ता न केव्हांही सुप्रसन्न। परस्परांच्या प्रसन्नतेवीण। वाउगा शीण श्रवणाचा ।।३१।। परम दुस्तर भवसागर। उसळती मोहाच्या लाटा अनिवार। आदळती अविचार-तटावर। पाडिती तरुवर धैर्याचे ।।३२।। वाजतो अहंकाराचा वारा। तेणें हा डहुळे सागर सारा। क्रोध-द्वेषादि महामगरां। मिळे जैं थारा निर्भयपणें ।।३३।। 'मी माझें' हा मगर। वासना विकल्प भंवरे अपार। निंदा-असूयादि जेथें तिरस्कार। असंख्य जलचर तळपती ।।३४।। ऐसा जरी हा सागर भयंकर। अगस्तिरूपें प्राशी गुरूवर। तयांचे जे चरण रजकिंकर। तयां न लवमात्र भय त्यांचें ।।३५।। म्हणोनि साई समर्थ सद्गुरू। होऊनियां भवाब्धीचें तारूं। आम्हीं जे केवळ कासधरूं। त्यां सर्वांस उतरू पैलपार

।।३६।। महादुस्तर हा भवार्णव। करा साईचरणांची नाव। दावील निर्भय पैल ठाव। पहा नवलाव निष्ठेचा।।३७।। पाळितां या ऐशा व्रता। भासे न संसारदुःख–तीव्रता। लाभ न अन्य येणेंपरता। सेव्य समर्थता ती हीच।।३८।। साईचरणीं अत्यंत भक्ती। नयनीं कोंदो साईमुर्ती। साईच दिसो सर्वांभूतीं। ऐसी ही स्थिती भक्तां येवो।।३९।। होऊनियां स्वछंदवर्ती। पूर्वजन्मीं पावलों च्युती। आतां तरी लाभो सद्‌गती। संगनिर्मुक्ती ये अर्थी।।४०।। पाठीसी असतां श्रीसमर्थ। कोणीही लावूं न शके हात। ऐसिया निर्धारें जे निर्धास्त। धन्य ते भक्त साईंचे।।४१।। असो आतां येतें मना। धरूनियां बाबांच्या चरणां। करावी तयांस एक प्रार्थना। सकल भक्तजनांकारणें।।४२।। कीं हा ग्रंथ सर्वां घरीं। असावा नित्य पाठांतरीं। नियमें प्रेमें पारायण करी। संकटें वारी तयांचीं।।४३।। होवोनियां शुचिर्भूत। प्रेम आणि श्रद्धायुक्त। वाचील जो हा सात दिसांत। अनिष्टें शांत तयांचीं।।४४।। तो हा अध्यात्मतंतूंनीं विणिला। कृष्णब्रह्मकथांहीं भरला। ब्रह्मात्मैक्यरसीं तरतरला। अपूर्व उथळलां अद्वैतीं।।४५।। या नाथकाव्यनंदनवनीं। बत्तीस खणांचिया वृदांवनीं। या गोड मनोहर [५]सदुग्धानी। ज्ञानी अज्ञानी रमताती।।४६।। करितां हें सच्चरित श्रवण। अथवा नेमें पारायण। करितील साईसमर्थचरण। संकटनिवारण अविलंबें।।४७।। धनेच्छूसी लाभेल धन। शुद्ध व्यवहारीं यश पूर्ण। फळ येईल निष्ठेसमान। येईना भावावीण अनुभव।।४८।। आदरें करितां ग्रंथवाचन। साईसमर्थ सुप्रसन्न। करी अज्ञानदारिद्र्य विच्छिन्न। ज्ञानधनसंपन्नता देई।।४९।। ग्रंथरचनीं साईसंकेत। तैसेंच तयाचें गुप्त मनोगत। होईल जो

५. 'सुदुग्धान्नीं' असावेसे वाटते. *अध्याय १८ मध्ये दिलेली टीप बघावी.

तच्चरणानुरक्त। धन्य त्या जीवित भक्ताचें।।५०।। चित्त करूनियां सुसमाहित। नेमनिष्ठ हें सच्चरित। वाचावा एक तरी अध्याय नित। होईल अमित सुखदायी।।५१।। जया मनी स्वहितविचार। तेणें हा ग्रंथ वाचावा साचार। जन्मोजन्मीं साईंचे उपकार। आनंदनिर्भर आठवील।।५२।। गुरूपौर्णिमा गोकुळअष्टमी।पुण्यतिथी रामनवमी। या साईंच्या उत्सवीं नियमीं। ग्रंथ निजधामीं वाचावा।।५३।। जैसा जैसा संग चित्तीं। तैसी तैसी जन्मप्राप्ती। अंते मती तैसी गती। शास्त्रसंमती यालागीं।।५४।। भक्तांचा आधार श्रीसाई। त्यावीण विघ्नें न पडतीं [६]ठायीं। लेकुरालागीं कनवाळू माई। येथ नवलाई काय ती।।५५।। काय वानूं कथा यापरती। शब्दचि जेथें पावती उपरती। वाटे रहावें मौनवृत्तीं। योग्य स्तुती ती हीच।।५६।। तरी तीव्र मोक्षेच्छा मनीं धरून। शुभ कर्मेच नित्य करून। श्रवणादि नवविध भक्तीचें सेवन। केलिया शुद्धांतःकरण होईल।।५७।। हें न सद्गुरूप्रसादावीण। तयावीण ना परतत्त्वज्ञान। 'ब्रह्मैवाहं' नित्य स्मरण। गुरूनिष्ठाप्रवण तो होय।।५८।। संबंध जैसा पितापुत्र। गुरू हे उपमा नाममात्र। पिता करी इहसुखा पात्र। गुरू इहामुत्र-सुखदाता।।५९।। पिता अर्पील क्षणिक वित्त। गुरू अर्पिल क्षयातीत। अविनाश वस्तु करील प्रतीत। अपरोक्ष हातांत देईल।।६०।। माता नऊ मास पोटीं धरी। जन्म देतां घाली बाहेरी। गुरूमातेची उलटी परी। बाहेरील भीतरीं घालील।।६१।। अंतीं 'गुरू गुरू' स्मरण करितां। शिष्य निःशंक लाधेल सायुज्यता। मग तो स्वयें गुरूनें हाणितां। पूर्णब्रह्मता लाधेल।।६२।। गुरूकरींचा आघात। करील जन्ममरण-निःपात। गुरूकरितां देहाचा अंत। कोण मग भाग्यवंत यापरता।।६३।। खड्ग

६. विघ्ने नाश पावत नाहीत.

तोमर फरश शूल। इत्यादी हातीं घ्यावें लागेल। आघात पडतां शुद्धि असेल। मुर्ती मग दिसेल सद्गुरूची।।६४।। कितीही करा देहाचें जतन। केव्हां तरी होणार पतन। मग तयाचें गुरूहस्ते हनन। पुनर्जननहारक।। ६५।। मारा मरेमरेंतों मार। छेदा माझा समूळ अहंकार। जेणें न पुनर्जन्म येणार। ऐसा मज दुर्धर द्या मार।।६६।। जाळा माझें कर्माकर्म। निवारा माझे धर्माधर्म। जेणें मज होईल सुख परम। ऐसा मोहभ्रम छेदावा।।६७।। घालवा माझें संकल्प विकल्प। करावें मज निर्विकल्प। पुण्यही नको नको मज पाप । नको हा उपद्व्याप जन्माचा।।६८।। जातां शरण रिघावयास। तंव तूं उभा चौबाजूंस। पूर्व पश्चिम अवघ्यां दिशांस। अधोर्ध्व आकाशपाताळीं।।६९।। अवघ्या ठायीं तुझा वास। तरी मजमाजींही तुझा वास। किंबहुना 'मी–तूं' हा भेदाभास। मानितां सायास मज वाटें।।७०।। म्हणुनी हेमाड अनन्य शरण। दृढ धरी सद्गुरूचरण। चुकवी पुनर्जन्ममरण। ऐसें निजोद्धरण संपादी।।७१।। ही काय थोडी कृति अघटित। भक्त उद्धाराया असंख्यात। निर्माण केले हें निजचरित। हेमाड निमित्त करूनियां।।७२।। हें श्रीसाईसमर्थचरित। व्हावें मज होतें हे अघटित। ना तों साईकृपेविरहित। पामरा मज अघटित हें।।७३।। नाहीं फारा दिसांचा सहवास। नाहीं संत ओळखण्याचा अभ्यास। अंगी न शोधक दृष्टीचें साहस। देखणें अविश्वासपूर्वक।।७४।। कधीं न केली अनन्यभावें उपासना। कधीं न क्षणभर बैसलों भजना। ऐसिया हस्तें चरितलेखना। करवुनीयां जना दावियलें।।७५।। साधावया निजवचनार्थ। साईच आठवुनी देती हा ग्रंथ। पुरवुनी घेती हा निजकार्यार्थ। हेमाड हा व्यर्थ नांवाला।।७६।। मशकें काय उचलावा मेरू। टिटवी जैं उपसावा सागरू। परी पाठीं असतां सद्गुरू। अद्भुत करणी

घडवितो ।।७७।। असो आता श्रोतेजन। करितों तुम्हांस अभिवंदन। जाहला हा ग्रंथ संपूर्ण। साईसमर्पण साईंचा ।।७८।। श्रोतृवृंदां सानथोरां। माझें लोटांगण एकसरा। तुमचेनि धर्में या कथासत्रा। साईचरित्रा संपविलें ।।७९।। मी कोण येथें संपविणार। हा तरी व्यर्थ अहंकार। जेथें साई सूत्रधार। तेथें हें म्हणणार मी कोण ।।८०।। तरी त्यागुनी अभिमान मूल ब्याद। गावे निजगुरूगुणानुवाद। मनोज्ञा त्या या बोधप्रद। ऐसिया वाग्यज्ञा संपवितों ।।८१।। येथें पूर्ण झाला हा [७]ग्रंथ। पूर्ण झाला माझा मनोरथ। पूर्ण झाला साईकार्यार्थ। मीही कृतार्थ जाहलों ।।८२।। ऐसा ग्रंथ अध्ययितां संपूर्ण। मन:कामना होतील पूर्ण। हृदयीं धरिल्या सद्गुरूचरण। होईल उत्तीर्ण भवसागर ।।८३।। रोगिया होय आरोग्य। दरिद्री होय धनाढ्य। संकल्प–विकल्पा येई स्थैर्य । दीना औदार्य लाभेल ।।८४।। पिशाच–बाधा अपस्मार। ग्रंथावर्तनें होतील दूर। मूक अपंग पंगू बधिर। तयांही सुखकर हें श्रवण ।।८५।। जो शक्तिमान् परमेश्वर। तयाचा जयांसी पडला विसर। ऐसे जे अविद्यामोहित नर। होईल उद्धार तयांचा ।।८६।। नर असूनि असुराचार। करूनि मिथ्या दवडिती शरीर। संसार मानिती सुखाचे आगर। होईल उद्धार तयांचा ।।८७।। अगाध साईनाथांची करणी। हेमाड नित्ययी स्थापिला चरणीं। तयाला निजसेवेसी लावुनी। सेवा ही करवुनी घेतली ।।८८।। शेवटीं जो जगच्चालक। सद्गुरू प्रबुद्धिप्रेरक। तयाच्या चरणीं अमितपूर्वक। लेखणी मस्तक अर्पितों ।।८९।।

।। श्रीसद्गुरूसाईनाथार्पणमस्तु ।। शुभं भवतु ।।

---

७. या अध्यायाच्या हस्तलिखितामध्ये इतर अध्यायांप्रमाणे समाप्तिदर्शक ओवी आढळली नाही.